# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
## -: दरपत्रक सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयाचे उपयोगाकरीता ए—४ साईजचे झेरॉक्स पेपर रिम खरेदी करावयाचे आहे. करीता स्थानिक बाजारातील विक्रेत्यांना सुचित करण्यात येते की, ज्यांना ए—४ साईज (७० जीएसएम) झेरॉक्स पेपर रिमच्या 'दरपत्रक' जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे दाखल करावयाच्या आहेत, त्यांनी आपले 'दरपत्रक' सिलबंद लिफाफ्यामध्ये दिनांक: २२/०७/२०२४ रोजीचे, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर कराव्यात.

**खरेदी करावयाच्या साहीत्याचा तपशील**

| अ.क्र. | साहित्याची नावे | दर प्रती रिम |
|---|---|---|
| १ | झेरॉक्स पेपर रिम, (ए—४) साईज, (७० जीएसएम) | प्रती रिम |

स्वा./-
(संजय भारूका)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-

१) दरपत्रकावर ''झेरॉक्स पेपर रिमचे दरपत्रक'' असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणाऱ्या संस्थेचे/पुरवठादराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे. तसेच दरपत्र लिफाफामध्ये नमुना कागद देण्यात यावा.

२) वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३) दरपत्रकामध्ये दर्शवल्याप्रमाणेच प्रती नग, दर्शवल्याप्रमाणेच दर नमुद करावे.

४) दरपत्रकातील दर हा सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

५) दरपत्रक मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहिल.

६) दरपत्रकातील नमुद साहित्याचा दर्जा पाहण्याची आवश्यकता भासल्यास त्या वेळी सादर करावे लागेल.

७) दरपत्रकातील नमुद दराप्रमाणेच वस्तुंचा/साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

८) साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे स्वत:च्या खर्चाने (दरपत्रक मंजुर झालेला संस्थेला/व्यक्तीला/विक्रेत्यास) आणुन दयावे लागेल. त्याबाबत या कार्यालयामार्फत कोणताही वाहतुकीचा इ. खर्च दिला जाणार नाही.

९) दरपत्रकातील दराप्रमाणेच वस्तुचा आदेशाप्रमाणे व दरपत्रकातील दराप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच सदर वस्तुच्या देयकाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

पृष्ठांकण क्र.३००२/रो.व.वि.वि./२०२४.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :१२/०७/ २०२४.

प्रतीलीपी: माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दिकरीता.

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.